**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक २६ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **आजच्या जागतिक तणाव आणि संघर्षाच्या काळात गौतम बुद्धांचे विचार अधिक महत्त्वाचे असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून प्रतिपादन**

2. **चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ताबदल होऊन काँग्रेसची सत्ता येईल असा विजय वडेट्टीवार यांचा दावा**

3. **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कर्करोगासारख्या गंभीर आजारांवर उपचार उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस असल्याची आरोग्य मंत्र्यांची माहिती**

4. **अकोला इथं आज ४६ पूर्णांक ९ दशांश अंश इतक्या कमाल तापमानाची नोंद; वर्धा, अमरावती आणि अकोला जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट**

**आता सविस्तर बातम्या .......**

**मन कि बात**

आज जग ज्या प्रकारच्या तणावातून आणि संघर्षातून जात आहे, अशा काळात गौतम बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या मन की बात कार्यक्रमात केलं. या कार्यक्रमाचा हा १३३ वा भाग होता. देशवासियांना आगामी बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन भगवान गौतम बुद्धांचा जीवन संदेश आजही प्रासंगिक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. दक्षिण अमेरिकेतील चिलीमध्ये एक संस्था भगवान बुद्धांचे विचार पुढे नेत असल्याचा त्यांनी कौतुकास्पद उल्लेख त्यांनी केला.

भारताने विज्ञानाला नेहमीच देशाच्या प्रगतीशी जोडलं आहे. शेतीपासून ते आधुनिक नवसंशोधकांपर्यंत सर्वांनाच भारताच्या नागरी अणू कार्यक्रमाने मोठी मदत केल्याचं पंतप्रधान म्हणाले. तामिळनाडूच्या कल्पक्कम येथील फास्ट ब्रीडर रिॲक्टरने क्रिटिकॅलिटी गाठल्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. हे अणू संयंत्र पूर्णपणे स्वदेशी

तंत्रज्ञानानं तयार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. हे यश साध्य करण्यात योगदान दिलेल्या सर्वांचं त्यांनी अभिनंदन केलं. यामुळे विकसित भारताच्या संकल्पालाही नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्यांनी पवन- शक्तीच्या क्षेत्रातील भारताच्या विकासाचा उल्लेख करून, आज भारत पवन-ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर असल्याचं सांगितलं. या क्षेत्रात महाराष्ट्रासह गुजरात, तामिळनाडू, राजस्थान या राज्यांत सुरु असलेल्या उपक्रमांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. पंतप्रधानांनी कच्छच्या रणामधील लाखो फ्लेमिंगोंचे आगमन, उत्तर प्रदेशातील गज मित्र उपक्रम, छत्तीसगडमध्ये काळवीट, माळढोक पक्षाचे संवर्धन आदी उपक्रमांचा मन कि बात मधून उल्लेख केला. ईशान्य भारत आपल्या सर्वांसाठी अष्टलक्ष्मी असल्याचं सांगून बांबूच्या क्षेत्रात ईशान्येच्या यशस्वी घोडदौडीची माहिती त्यांनी दिली. आपली जनगणनेची मोहीम ही जगातील सर्वात मोठी असल्याचं सांगून जनगणना 2027 यशस्वी करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी देशवासियांना केलं. मे महिना हा शाळकरी मुलांच्या सुट्टीचा काळ असल्यानं मुलांनी सुट्टीत आनंद लुटण्यासोबतच काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा आणि उन्हाळ्यात आपल्या आरोग्याचीही पूर्ण काळजी घ्यावी, असं आवाहनही मोदी यांनी आजच्या मन कि बात मधून केलं.

**विजय वडेट्टीवार**

चंद्रपूर महानगरपालिकेत लवकरच सत्ता बदल होऊन काँग्रेसची सत्ता येईल असा इशारा काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. नागपुरात आज विविध विषयांवर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मागील वेळी आमच्याकडून काही चुका झाल्या मात्र लवकरच चंद्रपूर महानगरपालिकेत आमची सत्ता येईल असं वडेट्टीवार म्हणाले -

छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान हे राज्य कधीही सहन करून घेणार नाही असं प्रतिपादन वडेट्टीवार यांनी यावेळी केलं. धीरेंद्र शास्त्री यांनी शिवाजी महाराजांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर टीका करत अशा लोकांना सरकार अभय देत असल्याचा आरोप त्यांनी केला. विरोधी पक्षात असताना एसटीच्या विलीनीकरणाची मागणी जे करत होते ते आज सत्तेत आल्यानंतर गप्प का? असा सवाल त्यांनी केला. तेलंगणा सरकारने एसटीचं विलीनीकरण करून कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या.

त्यांच्या कामाच्या वेळा कमी केल्या, पगारवाढ दिली आणि नोकरीत नियमितीकरण केलं. हे महाराष्ट्रात का होऊ शकत नाही असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला.

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना**

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार,अस्थिरोग आणि कर्करोगसारख्या गंभीर आजारांवर जनसामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याची घोषणा राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केली. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

**मंत्री प्रकाश आबिटकर**

राज्यातल्या आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांचं पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. ते काल मुंबईत आरोग्य विभागाच्या बैठकीत बोलत होते. या प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधी,प्रशासनातले अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचा सहभाग महत्वाचा असल्याचं ते म्हणाले.

**मंत्री प्रतापराव जाधव**

बुलढाणा जिल्ह्यात वारी हनुमान ते सलवान राम सेतू, केबल स्टेड एफओबी पादचारी पुलाच्या बांधकामा संदर्भात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी वन मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्याला यश आले असून वन विभागाने ह्या पादचारी पूल बांधण्यास परवानगी दिली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्या अंतर्गत येणाऱ्या वारी हनुमान ते सलवान दरम्यान पुल बांधण्यात यावा अशी मागणी येथील नागरिकांनी केली होती.

**कारवाई**

वाशीम जिल्ह्यात अनधिकृत सेवा केंद्रांचा फैलाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलत धडाकेबाज कारवाई केली आहे. शासकीय सेवांच्या नावाखाली नागरिकांची दिशाभूल आणि आर्थिक शोषण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.या पार्श्वभूमीवर वाशिम शहरात आणि अनसिंग येथे ही मोहीम राबविण्यात आली. नागरिकांनी केवळ अधिकृत सेवा केंद्रांचाच वापर करावा आणि शासनाने

निर्धारित केलेल्या शुल्कापलीकडे कोणतेही अतिरिक्त पैसे देऊ नयेत, असं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

**हवामान**

अकोला इथं आज विक्रमी ४६ पूर्णांक ९ दशांश अंश इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात तापमानाचा पारा 40 अंशाच्या पुढे गेला आहे. आज आणि उद्या अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन हवामान खात्याने केलं आहे. यासोबतच उद्या नागपूर, बुलढाणा आणि चंद्रपूर इथं उष्णतेचा लाटेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. 29 एप्रिल पर्यंत बहुतांशी जिल्ह्यामध्ये उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. आज सकाळी साडेअकरा वाजता अकोला इथं 43.8, अमरावती इथं 42.4, वर्धा इथं 42.5 आणि चंद्रपूर इथं 41.2 दशांश अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली होती.दरम्यान नागपुरात आज 45.4 अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं आहे. येत्या काही तासात चंद्रपूर जिल्ह्यात वादळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**बुद्धिबळ स्पर्धा**

AICFB महाराष्ट्र राज्य निवड बुद्धिबळ स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा सोहळा आज ग्रँड मास्टर दिव्या देशमुख हिच्या उपस्थितीत पार पडला.नागपुरात दिनांक २३ ते २६ एप्रिल दरम्यान नेत्रहीन बुद्धिबळपटूंसाठी य ा स ्पर्धेचं आयोजन ह िंगणा इथल्या ज ्ञानज्योती निवासी अंध विद्यालयात करण ्यात आलं होतं. या स्पर्धेत दहा वर्षाच्या वेद फउरे याला ११ हजार रुपयांचं प्रथम पारितोषिक देण्यात आलं. तर शिवम साबत याने द्वितीय क्रमांकाचं तर मदन बागायतकर याने तृतीय क्रमांकाचं पारितोषिक जिंकलं.

******